# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगरपालिकेकडुन सदय स्थितीत एकुण ०४ खाजगी सुरक्षा एजेन्सी मार्फत एकुण २९० सुरक्षा रक्षकांची सेवा घेण्यात येत आहे.खाजगी सुरक्षा एजेन्सीमार्फत सुरक्षा रक्षकांना नियमाप्रमाणे वेतन दिले जात नसल्याच्या तक्रारी काही संघटनामार्फत कार्यालयास प्राप्त् होत असल्याने मनपात प्रायोगीक तत्वावर " महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ " (MSSC/ MSF) यांचेकडील ५० सुरक्षा रक्षक घेणेबाबतचा विषय मा.स्थायी समिती समक्ष मंजुरी करिता ठेवण्यात आला असता मा.स्थायी समितीने मनपाची आर्थीक परिस्थीती पाहता MSF तर्फे सुरक्षा रक्षक घेवून अधिकचा आर्थिक बोझा निर्माण करणे योग्य होणार नाही व रितसर निवीदा प्रक्रियेत भाग घेवून स्पर्धात्मक दरात काम करून घेणे योग्य होईल या सुचनेसह ठराव क्र. ११ दि. ३०.०३.२०२१ अन्वये विषयास नामंजुरी प्रदान केलेली होती.

**{सामान्य प्रशासन विभाग}**

उक्त ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनीयम १९४९ चे कलम ४५१ नुसार विखंडीत करण्यास्तव नगरविकास विभाग-२ महाराष्ट्र शासन यांचेकडे दिनांक २१.०६.२०२१ व ३१.०८.२०२१ अन्वये पत्र व्यवहार करण्यात आला असता नगरविकास विभागाने दि.२९.०९.२०२१ रोजी सादर केलेल्या पत्रात नमुद केलेल्या मुद्यांत "महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ"५० सुरक्षा रक्षक पुरविण्यास सहमत असल्याचे सहमती पत्राची मागणी केलेली होती.

उक्त मुद्ययांचे अनुषंगाने विभागाने महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडे दि.०४.१०.२०२१ व दि.०७.१२.२०२१ अन्वये पत्र व्यवहार करून सहमती पत्र पाठविणेस विनंती केलेली होती.

" महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ" यांनी दि.१६.०६.२०२२ रोजी पत्र सादर करून महामंडळाने मनपास सुरक्षा रक्षक पुरविण्यास सहमती दर्शविली असल्याने स्थायी समिती ठराव विखंडीत करणेसबंधीत नगरविकास विभागाने दि.२९.०९.२०२१ चे पत्रात उपस्थित केलेल्या मुद्ययांची माहिती नगरविकास विभागाकडे पाठविण्याबाबतची प्रक्रिया करण्यात आलेली आहे.

नागपूर मनपाचे विविध विभाग व क्षेत्रीय कार्यालयात खाजगी सुरक्षा रक्षक एजेन्सीमार्फत सुरक्षा रक्षकांची सेवा स्थायी समिती ठराव क्र.९५६ दि.२७.०१.२०२० अन्वये घेण्यात येत आहे.करारनाम्याची मुदत दि.३१.०७.२०२२ रोजी सपुष्टात येत आहे.

शासन निर्णय क्र.एसजीए-१५०६/प्र.क्र.९२/काम-५ मंत्रालय,मुंबई दि.०८ नोव्हेंबर २००६ अन्वये महानगरपालिका /स्थानिक स्वराज्य संस्था यांनी खाजगी अभिकरणामधून सुरक्षा रक्षकांची मागणी न करता शासनाने स्थापन केलेल्या सुरक्षा रक्षक मंडळाकडुनच सुरक्षा रक्षकांची मागणी करावी व यातुनच सुरक्षा रक्षकांची प्राधान्याने नेमणुक करण्याचे नमुद आहे.

खाजगी एजन्सीच्या तुलनेत MSF कडून प्राप्त होणारी सुरक्षारक्षकांची गुणवत्ता तुलनेनेअधिक आहे. MSF च्या सुरक्षारक्षकाच्या पात्रतेसाठी १२ वी पास ,संगणक हाताळण्याचे ज्ञान,पोलीसांप्रमाणे आवश्यक शारिरीक क्षमता आवश्यक असुन खाजगी सुरक्षारक्षकांसाठी अशी पात्रता नसल्याने MSF चे सुरक्षारक्षक अधिक गुणवत्तेचे असतील ज्यामुळे प्रशासनास त्याचा फायदा होईल. तसेच सुरक्षारक्षकांचे प्रत्यक्ष वेतन अदायगी, ईपीएफ, ईएसआयसी / बोनस याबाबतीत अधिक पारदर्शकता राहील.

त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासन राजपत्र दि.१९ एप्रिल २०१० अन्वये ११ मार्च २०१० पासुन महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ (MSF) अंमलात आणण्यात आल्याचे नमुद असल्यानुसार पुढील कालावधीकरीता महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ,मुबई यांचे मार्फत सुरक्षा रक्षकांची सेवा घेणेस व मंडळाकडे विहित नमुण्यात अर्ज करून व Induction Process पुर्ण करून व आवश्यक रकमेचा भरणा करून मनपास ( MSF) मंडळाकडे पंजीबदध होणेबाबतचा प्रस्ताव व महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचेअदांजे २९० सुरक्षा रक्षक/ १५ पर्यवेक्षक व ३ सिक्युरीटी ऑफीसरकरिता होणारा खर्च मा.प्रशासक ठरावाचे मान्यतेस ठेवण्यात येत आहे.सुरक्षा रक्षक व ईतर अधिकारी यांची आवश्यकतेनुसार संख्या कमी वा जास्त करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना राहील.

| विवरण | प्रतिमाह दर | वस्तु व सेवा कर १८% | एकुण दर | एकुण संख्या | अदांजे मासिक खर्च | अंदाजे वार्षिक खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| सुरक्षा रक्षक | २३०००/- | ४१४०/- | २७१४०/- | २९० | ७८७०६००/- | ९४४४७२००/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पर्यवेक्षक | २९०००/- | ५२२०/- | ३४२२०/- | १५ | ५१३३००/- | ६१५९६००/- |
| सिक्युरीटी ऑफीसर | ३६०००/- | ६४८०/- | ४२४८०/- | ३ | १२७४४०/- | १५२९२८०/- |
| | | | | | अंदाजे एकुण खर्च | १०२१३६०८०/- |

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडून सुरक्षा रक्षकांची नेमणुक / नियुक्ती होईपर्यत कार्यरत चार खाजगी सुरक्षा एजेन्सीचे कार्य सुरू ठेवण्याबाबतचा प्रस्ताव तसेच (MSF) कडील सुरक्षा रक्षकांचे नेमणूकी करीता येणारा खर्च रू.१०२१३६०८०/-/-प्रशासकिय मान्यतेस ठेवण्यात येत आहे.

**टिप:-** सन २०२२-२३ चे अर्थसंकल्पात पद क्र.२० (A२८३००१२१९०४) सुरक्षा व्यवस्था व्यय या लेखाशिर्ष मध्ये रू.१०००/- लक्ष खर्चाची तरतुद उपलब्ध करण्यात आलेली आहे. उक्त तरतुदी मधुन रू.२११/- लक्ष प्रावधान वजा जाता रू.७८९/-लक्ष प्रावधान शिल्लक आहे.

सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

# पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- ४२/मनपा/प्रशासक** **दिनांक :- २९/०७/२०२२**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सहा. आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसारनागपूर महानगरपालिकेकडुन सदय स्थितीत एकुण ०४ खाजगी सुरक्षा एजेन्सी मार्फत एकुण २९० सुरक्षा रक्षकांची सेवा घेण्यात येत आहे.खाजगी सुरक्षा एजेन्सीमार्फत सुरक्षा रक्षकांना नियमाप्रमाणे वेतन दिले जात नसल्याच्या तक्रारी काही संघटनामार्फत कार्यालयास प्राप्त् होत असल्याने मनपात प्रायोगीक तत्वावर “ महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ ” (MSSC/ MSF) यांचेकडील ५० सुरक्षा रक्षक घेणेबाबतचा विषय मा.स्थायी समिती समक्ष मंजुरी करिता ठेवण्यात आला असता मा.स्थायी समितीने मनपाची आर्थीक परिस्थीती पाहता MSF तर्फे सुरक्षा रक्षक घेवून अधिकचा आर्थिक बोझा निर्माण करणे योग्य होणार नाही व रितसर निवीदा प्रक्रियेत भाग घेवून स्पर्धात्मक दरात काम करून घेणे योग्य होईल या सुचनेसह ठराव क्र. ११ दि. ३०.०३.२०२१ अन्वये विषयास नामंजुरी प्रदान केलेली होती.

उक्त ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनीयम १९४९ चे कलम ४५१ नुसार विखंडीत करण्यास्तव नगरविकास विभाग-२ महाराष्ट्र शासन यांचेकडे दिनांक २१.०६.२०२१ व ३१.०८.२०२१ अन्वये पत्र व्यवहार करण्यात आला असता नगरविकास विभागाने दि.२९.०९.२०२१ रोजी सादर केलेल्या पत्रात नमुद केलेल्या मुद्यांत “महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ”५० सुरक्षा रक्षक पुरविण्यास सहमत असल्याचे सहमती पत्राची मागणी केलेली होती.

उक्त मुद्ययांचे अनुषंगाने विभागाने महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडे दि.०४.१०.२०२१ व दि.०७.१२.२०२१ अन्वये पत्र व्यवहार करून सहमती पत्र पाठविणेस विनंती केलेली होती.

“ महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ” यांनी दि.१६.०६.२०२२ रोजी पत्र सादर करून महामंडळाने मनपास सुरक्षा रक्षक पुरविण्यास सहमती दर्शविली असल्याने स्थायी समिती ठराव विखंडीत करणेसबंधीत नगरविकास विभागाने दि.२९.०९.२०२१ चे पत्रात उपस्थित केलेल्या मुद्ययांची माहिती नगरविकास विभागाकडे पाठविण्याबाबतची प्रक्रिया करण्यात आलेली आहे.

नागपूर मनपाचे विविध विभाग व क्षेत्रीय कार्यालयात खाजगी सुरक्षा रक्षक एजेन्सीमार्फत सुरक्षा रक्षकांची सेवा स्थायी समिती ठराव क्र.९५६ दि.२७.०१.२०२० अन्वये घेण्यात येत आहे.करारनाम्याची मुदत दि.३१.०७.२०२२ रोजी सपुष्टात येत आहे.

शासन निर्णय क्र.एसजीए-१५०६/प्र.क्र.९२/काम-५ मंत्रालय,मुंबई दि.०८ नोव्हेबर २००६ अन्वये महानगरपालिका /स्थानिक स्वराज्य संस्था यांनी खाजगी अभिकरणामधून सुरक्षा रक्षकांची मागणी न करता शासनाने स्थापन केलेल्या सुरक्षा रक्षक मंडळाकडुनच सुरक्षा रक्षकांची मागणी करावी व यातुनच सुरक्षा रक्षकांची प्राधान्याने नेमणुक करण्याचे नमुद आहे.

खाजगी एजन्सीच्या तुलनेत MSF कडून प्राप्त होणारी सुरक्षारक्षकांची गुणवत्ता तुलनेनेअधिक आहे. MSF च्या सुरक्षारक्षकाच्या पात्रतेसाठी १२ वी पास ,संगणक हाताळण्याचे ज्ञान,पोलीसांप्रमाणे आवश्यक शारिरीक क्षमता आवश्यक असुन खाजगी सुरक्षारक्षकांसाठी अशी पात्रता नसल्याने MSF चे सुरक्षारक्षक अधिक गुणवत्तेचे असतील ज्यामुळे प्रशासनास त्याचा फायदा होईल. तसेच सुरक्षारक्षकांचे प्रत्यक्ष वेतन अदायगी, ईपीएफ, ईएसआयसी / बोनस याबाबतीत अधिक पारदर्शकता राहील.

त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासन राजपत्र दि.१९ एप्रिल २०१० अन्वये ११ मार्च २०१० पासुन महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ (MSF) अंमलात आणण्यात आल्याचे नमुद असल्यानुसार पुढील कालावधीकरीता महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ,मुबई यांचे मार्फत सुरक्षा रक्षकांची सेवा घेणेस व मंडळाकडे विहित नमुण्यात अर्ज करून व Induction Process पुर्ण करून व आवश्यक रकमेचा भरणा करून मनपास ( MSF) मंडळाकडे पंजीबदध होणेबाबतचा प्रस्ताव व महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचेअदांजे २९० सुरक्षा रक्षक/ १५ पर्यवेक्षक व ३ सिक्युरीटी ऑफीसरकरिता होणारा खर्च मा.प्रशासक ठरावाचे मान्यतेस ठेवण्यात येत आहे.सुरक्षा रक्षक व ईतर अधिकारी यांची आवश्यकतेनुसार संख्या कमी वा जास्त करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना राहील.

| विवरण | प्रतिमाह दर | वस्तु व सेवा कर १८% | एकुण दर | एकुण संख्या | अदांजे मासिक खर्च | अंदाजे वार्षिक खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| सुरक्षा रक्षक | २३०००/- | ४१४०/- | २७१४०/- | २९० | ७८७०६००/- | ९४४४७२००/- |
| पर्यवेक्षक | २९०००/- | ५२२०/- | ३४२२०/- | १५ | ५१३३००/- | ६१५९६००/- |
| सिक्युरीटी ऑफीसर | ३६०००/- | ६४८०/- | ४२४८०/- | ३ | १२७४४०/- | १५२९२८०/- |
| | | | | | अंदाजे एकुण खर्च | १०२१३६०८०/- |

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडून सुरक्षा रक्षकांची नेमणुक / नियुक्ती होईपर्यत कार्यरत चार खाजगी सुरक्षा एजेन्सीचे कार्य सुरू ठेवण्याबाबतचा प्रस्ताव तसेच (MSF) कडील सुरक्षा रक्षकांचे नेमणूकी करीता येणारा खर्च रू.१०२१३६०८०/-/-प्रशासकिय मान्यतेस ठेवण्यात येत आहे. (सन २०२२-२३ चे अर्थसंकल्पात पद क्र.२० (A२८३००१२१९०४) सुरक्षा व्यवस्था व्यय या लेखाशिर्ष मध्ये रू.१०००/- लक्ष खर्चाची तरतुद उपलब्ध करण्यात आलेली आहे. उक्त तरतुदी मधुन रू.२११/- लक्ष प्रावधान वजा जाता रू.७८९/-लक्ष प्रावधान शिल्लक आहे.)

उक्त प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**

**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**

**प्रशासक**

**नागपूर महानगरपालिका, नागपूर**